RNI No. MAHBIL/2009/31732

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष २, अंक १४] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट २६-सप्टेंबर १, २०१०/भाद्र. ४-१०, शके १९३२ [पृष्ठे ४

[ किंमत : रुपये ४.०० ]

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ ऑगस्ट २०१०

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक रापोसे. १२०८/प्र.क्र. २०२/पोल-१अ.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि यासंबंधात अस्तित्वात असलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, गृह विभागाच्या नियंत्रणाखालील पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, गट-अ या पदाच्या सेवा भरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहे जसे :—

१. या नियमांना, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, गट-अ, पोलीस आयुक्त कार्यालय, बृहन्मुंबई (सेवाप्रवेश) नियम, २०१० असे संबोधण्यात यावे.

188

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) "आयुक्त कार्यालय" म्हणजे गृह विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत असलेले पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय.

(ब) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

३. आयुक्त कार्यालयातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, गट-अ या पदावर, आयुक्त कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी, गट-ब या पदावर किमान तीन वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या अधिकाऱ्यांची जेष्ठता अधीन पात्रता या आधारावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल.

४. पदोन्नतीने नियुक्ती झालेल्या व्यक्तीस जर ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर आयुक्त कार्यालयाने विहित केलेली विभागीय परीक्षा आणि हिंदी व मराठी भाषा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

५. या पदावर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस जर ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी विहित केलेले संगणक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

६. या पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, आयुक्त कार्यालयाच्या अधिपत्याखालील कोणत्याही कार्यालयांमध्ये बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रु. न. देशमुख,**
शासनाचे सह सचिव.

(41) (187)

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 11th August 2010

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. SPS. 1208/CR-202/Pol-1-A.—In Exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make following rules regulating recruitment to the posts of Senior Administrative officer, Group A in the office of the Commissioner of Police, Brihan Mumbai under the administrative control of Home Department, namely :—

1. These rules may be called Senior Administrative Officer, Group A, Commissioner of Police, Brihan Mumbai (Recruitment) Rules, 2010.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Commissioner Office" means the office of the Police Commissioner, Brihan Mumbai working under the administrative control of the Home Department of the Government of Maharashtra ;

(*b*) "Government" means the Government of Maharashtra ;

3. Appointment to the posts of Senior Administrative Officer, Group A, in the Commissioner office shall be made by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of Administrative Officer, Group B in the Commissioner Office having not less than 3 years of regular service in that post.

4. A person appointed to the post shall be required to pass the Departmental examination prescribed by the Commissioner Office, if any ; and examinations in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed or has been exempted from passing those examinations.

5. A person appointed to the post, shall possess a certificate in computer operation prescribed by the the Directorate of Information Technology, Government of Maharashtra, from time to time.

6. A person appointed to the post shall be liable for transfer in any office under the jurisdiction of the Commissioner Office.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. N. DESHMUKH,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.